# प्रभुतरुण

| वर्ष ५३ | अंक ७ | मुंबई | १६ फेब्रुवारी, २०२० | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)* **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## ज्ञातीय गणतंत्र

—सुहासिनी कीर्तिकर

कोणतीही साहित्यकृती ही आपल्या जगण्याचेच प्रतिबिंब असते. मात्र ती एका ठराविक व्यक्तीची वा समाजाची त्या साहित्यात भासलेली व्यक्तिरेखा तरी असते वा सर्वकाळ जगणाऱ्या कुणाही जीवाची किंवा कुठल्याही काळच्या, कुठल्याही मातीतल्या समाजाची. त्यातील निरीक्षणातून, परीक्षणातून, आत्मानुभूतीतून लेखकाने तिला आगळावेगळा आकार दिलेला असतो जो वाचकमनाशी नाते सांगून जातो. म्हणूनच वाचकाचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. कारण त्यातील बंध अनुबंध लेखकाने वाचकमनांशीही विणलेले असतात. म्हणूनच साहित्य वाचताना वाचक आपआपल्या मनात एक स्वतंत्र आकारकृती, आस्वादकृती तयार करत असतात. असे साहित्य अजरामर, अक्षर ठरते.

लेखक ही सहज किमया साधतो. कादंबरीलेखनाविषयीचे तंत्र सांगताना दिलेले उदाहरण मला इथे आठवते. 'एक राजा होता' या वाक्यानंतर दुसरे वाक्य असे येते- 'एक राणी होती.' या दोन वाक्यांत वस्तूस्थिती निदर्शक विधाने आहेत. 'एक राजा होता' या वाक्यातून ध्वनित होते की कोण्या एके काळी, कोण्या एका राज्यात राजा होता. बस्स. दुसऱ्या वाक्याशी त्याचा संबंध असावाच असे नाही. ती 'एक राणी' ही कुठल्याही काळी, कुठल्याही राज्याची राणी असू शकते. पुढचे वाक्य येते - 'राजा मेला' ठीकाय. वस्तुस्थिती दर्शविणारी भूतकाळी घटना. तसेच चौथे वाक्य - 'राणी मेली'. आता या चार विधानांतून साहित्यकृती आकारतच नाही. मात्र हीच वाक्ये समजा जर लेखकाने अशी मांडली - 'एक राजा होता. एक राणी होती. राजा मेला. त्याच्या दु:खाने राणी मेली.' तर यातून एक भावबंध आणि व्यक्तिमत्व व्यक्त होते. लेखकाने हा बंध आपल्या परीने उभा केला तेव्हा त्याच्या प्रतिभेने भावबंध तयार केला. मग त्यातून घटनेला नाट्य बिलगते. एक साहित्यरूप लाभते तिला. गंमत म्हणजे हे लेखनातच घडते असे नाही. आपल्या भवताली घडणाऱ्या घटनांशी आपण जेव्हा मनाने बांधलेले असतो तेव्हा आपल्या मनात एक जो भावबंध जुळतो - त्यातून अशा घटना आपले 'जगणे'च ठरतात. त्यामुळे कलाकृतीइतकाच या घटना आपल्याला आनंद देतात, आस्वादता येतात.

काही अलीकडचीच उदाहरणे पाहू या. सॉलिसिटर राजन जयकर यांचे म्युझियममध्ये कार्यक्रम झाले. वर्तमानपत्रातून सौ. केतकी आणि श्री. राजन यांचा फोटो झळकला तेव्हा ती त्यांच्याबाबतीतील अभिमानास्पद घटना होती. पण ज्ञातीय भावबंधामुळे त्यांचा सन्मान, त्यांचे कर्तृत्व हे आपल्याला ज्ञातीचेच भूषण वाटले. कारण साहित्यकृतीत ज्याप्रमाणे घटना या वाचकांशी नाते जोडतात त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जगण्यातही आपले संवेदनाक्षम मन ज्ञातीघटनांशी जोडलेले असते. अशावेळी या घटना साहित्यापेक्षाही काकणभर सरसच ठरतात. कारण त्या कविकल्पना नसतात. माझी मुलगी सौ. अनुराधा आपल्या व्यस्त दैनंदिन जीवनातूनही वेळ काढून दरवर्षीच्या मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेते तेव्हा ती एक अभिमानास्पद ज्ञातीय घटना असते. एक आई या भूमिकेतून झालेल्या आनंदाबरोबरीने एक ज्ञातीय म्हणून याचा आनंद अधिकच असतो. या आनंदाच्या उर्मी कुठल्याही साहित्यानंदापेक्षा कमी नसतात. कारण त्यात 'एकोऽहम् बहुस्याम' ची अनुभूती असते; जी साहित्यकृतीतून आपल्याला लाभत असते. श्री. सुजन राणे यांना विवेकानंद प्रतिष्ठानने सपत्नीक कन्याकुमारीला बोलावून त्यांचा सन्मान केला. त्यांचे तिथे गाणे झाले. या त्यांच्या कर्तृत्वाचा आनंद त्यांच्या कुटुंबीयांपेक्षा कदाचित अधिकच आपल्याला झाला. कारण आपण त्यांचे अलौकिक कुटुंबीयच आहोत. त्यामुळे आपला जुळलेला भावबंध उच्च प्रतीच्या आनंदाचा भाग आहे. अशी किती उदाहरणे द्यावीत? डॉ. सुमन नवलकर यांचे कथाकथन गिरगावच्या नानानानी शाळेत झाले. असाच आनंद भोगण्यासाठी मी त्या कार्यक्रमाला आवर्जून गेले. एक साहित्यिक मैत्रीण म्हणून त्यांच्या कथनाचा आनंद मी लुटलाच. पण त्या आनंदाच्या लयलुटीत एक ज्ञातीय असल्याची माझी भावनाही भर घालत होतीच. साहित्यकार आणि वाचक यांचे जे भावनेच्या अल्याडपल्याड नाते साहित्यकृतीतून तयार होते... त्याचीच ही जातकुळी ना?

डॉ. दीपा क्षीरसागर 'चिऊताई चिऊताई दार उघड ...' या बालकवितांच्या संपादित पुस्तकात जेव्हा नलिनी तळपदेंच्या कवितेचा समावेश करतात तेव्हा अगदी आनंदून ही बातमी मी नलिनाताईंना कधी सांगते असे मला झाले. ती पूर्ण कविताच माझ्या मनात रुंजी घालू लागते. 'असे कसे?' हे त्या कवितेचे शीर्षकच वापरून म्हणायचे झाले तर त्याचे उत्तर हेच की त्या 'आपल्या' आहेत. म्हणजे ज्ञातीय आहेत. आता नुकतीच हाती आलेली बातमी पहा. श्री. आकाश आशुतोष नवलकर यांची 'गिनेज बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली. त्यांना तसे पत्र मिळाले. चषक मिळाला. काय झाले त्यामुळे? त्यांच्या गिटारचा झंकार आपल्या मनात एक ज्ञातीय म्हणून झंकारला. या सगळ्यांशी आपले 'तुझे माझे नाते, एकच वीण आपल्यामधून जाते' असेच भावबंध आहेत ना?

याचाच अर्थ असा की सार्वजनिक, सामाजिक, वैश्विक पातळीवर साहित्य जसा आनंद देते तसाच सामाजिक स्तरातील ज्ञातीय पातळीवरही भावसुंदर आनंद आपल्याला मिळतो. वैश्विक पातळीवरील ताणेबाणे असतातच. त्याचे भव्य, सुंदर महावस्त्र तयार होतेच. पण याच ताण्याबाण्यांना सामाजिक अन्वय असल्याने ज्ञातीपातळीवरही या धाग्यांनी उबदार गोधडी तयार होते. अशा गोधडीची मनाला फार फार गरज असते. कारण यातूनच मनाचे भरलेपण, तृप्तपण तयार होते. यालाच आपण 'माईंड फुलनेस' म्हणत असू कदाचित.

असा तृप्तीचा भाव वरचेवर दाटून येवो. जागतिक एकात्मतेकडे झुकताना हे भरलेपणाचे अंतस्थ धागे अधिकाधिक बळकट होवोत. 'दुसऱ्याचा तो ठोंब्या' नाहीच म्हणत आपण. पण 'आपला तो बाब्या' म्हणण्याची विशाल मानसिकता यातून अधिक जोमाने उभारून येवो.

देशाच्या गणतंत्र दिवसाच्या शुभेच्छा मनात उभारून येत असताना ज्ञातीय गणतंत्रही उंच उंच फडकत राहो! त्याशिवाय आनंदाची परिपूर्ती नाहीच ना?

(मोबाईल : ९८२०२५६९७६)

# Box Cricket Tournament 2020

**-Jayant Kirtikar**

The box cricket tournament organised by Pathare Prabhu Social Samaj was held on 12th January 2020 at the lions club foundations basketball court near Milan Subway, Santacruz (west).

Ten Teams comprising of 90 players participated in 17 matched throughout the day, which had 2 ladies & childrens teams similar to last year. The 2 youngest players were 7 year old Nirvighnam Wazkar and Myra Rane, and the 'Young at heart' seniormost player was 74 year old Subhash Desai, for whom late Smt. Vandana Navalkar has sponsored a trophy.

At around 8.30 am President Smt. Swati Rane welcomed everybody and inaugrated the tournament by the toss of the coin for the 1st match of the day played between teams A and B

The ladies and children's winning team was captained by Bhupati Senjit which included Shweta Talpade, Vidya Talpade, Aditi Talpade, Ashwin Talpade, Nirvighnam Wazkar, Myra Rane, Aayush Ajinkya and Avanti Talpade. The runners-up team led by Pallavi Kothare included Anusha Agaskar, Janhvi Agaskar, Salomi Senjit, Vivaan Agaskar, Aarush Agaskar, Rihan Mankar, Ayyan Agaskar and Meghnad Vijayakar. The Best Batsman's Trophy was won by Aarush Agaskar, and Ashwin Talpade was adjudged as the best bowler. All the trophies of the ladies and children's event were sponsored by Mr. Anil Rao, Mrs. Archana Vijaykar and Mrs. Namrata Vijaykar of Pathare Prabhu Cricketers; in memory of late Mrs Sheela Purnachandra Rao on the occassion of her 100th Birth Anniversary.

The men's Tournament was won by Team F captained by Sanket Dhairyawan which had Shriniwas Kothare, Yuvraj Kirtikar, Aditya Kirtikar, Krish Mankar, Amogh Talpade, Ajay Kothare, Akshay Kirtikar and Diljit Gorakshakar. Akshay Kothare's Team E declared Runners-Up, which included Pranavesh Dhairyawan, Sneh Ajinkya, Omkar Kothare, Dr Amit Dhairyawan, Siddharth Dharadhar, Uday Talpade, Sanman Dhurandhar and Rakesh Kirtikar. Krish Mankar won the best batsman's trophy and the best bowler was Siddharth Dharadhar. Yadnesh Dhurandhar won the best fielders trophy. The coveted man of the tournamnet trophy was also won by Krish Mankar. A special prize was given to young Yuvraj Rajesh Kirtikar, which was sponsored by spectators Mr. Deepak Dhairyawan, Mr. Abhay P. Kiritikar.

The Trophies for the men's event were sponsored by Mrs. Neeta & Mr Milind M. Senjit in memory of late Mr. Manohar Sunderrao Senjit on the occassion of his 100th Birth anniversary. Mr. Senjit had represented Prabhu Jolly cricket team for nearly 3 decades.

Mr. Vilas Godbole, ex-mumbai Ranji Trophy player was the chief guest of the tournament. Jt. Secretary Mr. Jayant Kirtikar while introducing him mentioned his career record both as a cricketer and as coach cum manager of various Mumbai Junior and Senior Teams.

Mr Jayant Kirtikar informed the chief guest that the Pathare Prabhus are a cricket loving community and way back in the 1930s, late Dinkar Sunderrao Talpade was selected to play test cricket, after having played Ranji Trophy for Bombay under the captaincy of Vijay Merchant and later Samir Talpade was a contemporary of Sachin Tendulkar in the Mumbai Ranji Trophy team.

President Smt. Swati Rane felicitated the chief guest with a flower bouquet and requested him to say a few words. Mr. Godbole said that he was delighted to preside over the function since his association with the Pathare Prabhu community went back a long way, with his father being closely associated with the late Mr. Madhu Rane's our own club. He himself took pride in having represented the club along with Dilip Sardesai, he clearly remembered the late Annaubal Nawalkar's quality spin bowling. He advised youngsters to put in hard work during cricket practice, and predicted that young Yuvraj (late Shri Kirtikar's grandson) has a bright future. He added that he has mentioned Vijay Dhurandhar and Raju Talpade's achievements in his book. He announced a donation of Rs. 5000/- for next year's tournament. In his vote of thanks address, Jt. Sec. Jayant Kirtikar thanked the following donors/ sponsors of the tournament.

1. The executer of the Estate of late Mrs. Premalata K. Rane.
2. Mr. Anil P. Rao, Mrs. Archana J. Vijaykar and Mrs. Namrata A. Vijayakar of Pathare Prabhu cricketers for donation in memory of late Mrs. Sheela Purnachandra Rao on the occassion of her 100th Birth Anniversary.
3. Mrs. Neeta and Mr. Milind M. Senjit for donation in memory of late Mr. Manohar Sunderrao Senjit on the occassion of his 100th Birth Anniversary.
4. Dr. Pradeep Gajanan Vijaykar
5. Mr. Charudutt Navinchandra Dhairyawan in memory of his father late Mr. Navinchandra Shamrao Dairyawan.
6) Mr. Shailendra Surendra Kirtikar
7. Smt. Aruna Sujit Kirtikar in memory of late Mr. Sujit Yeshwantrao Kirtikar.
8. Mr. Milind Madhukar Vyavaharkar
9. Mr. Kiran Ramchandra Talpade
10. Mr. Deepak & Mrs. Neelan Dhairyawan.
11. Late Smt. Vandana Pramod Navalkar
12. Mr. Yadnesh Vijay Dhurandhar for the Tennis Balls, in memory of his mother late Mrs. Neha V. Dhurandhar.
13. Mr. Arman Akshay Kothare for donation in memory of great grand father late Mr. Narayan Sunderrao Kothare and 14. Mr. Sunil Manohar Jayakar.

Mr. Jayant Kirtikar thanked Committee Member Mr. Rahul Agaskar for the Artwork of the facebook & Wats app and for taking photos of the event. He also thanked Mr. Sudhir Dhurandhar for providing the catering service for the tournament. He was ably assisted by Mrs. Ameeta Mankar. Mr. Raju Talpade was also thankded for using his good offices to provide the services of MCA Umpires and Scorer.

The rules of the tournament were framed by Mr. Jayant Kirtikar and Mr. Vijay Dhurandhar.

The Tournament organising committee comprised of Jt. secretaries Jayant Kirtikar & Mrs. Neeta Senjit, committee members Vijay Dhurandhar, Abhijit Vijaykar, Anirudh Kirtikar and Smt. Shilpa Dhurandhar. Jt. Secretary Mrs. Neeta Senjit announced the names of all the trophy winners for the chief guest to give away the trophies.

Nearly 200 people attended the tournament and the players as well as spectators were provided breakfast, lunch and tea on behalf of the Samaj.

A notable feature of the tournament was that this year also, 3 generations of the Kothare family from Pune, Mr. Sudeep, Akshay and Arman participated once again and Harish Ashish Dhurandhar came all the way from Ahmedabad to play.

This year P.P. Mahila Samaj's portable speaker was made use of for commentary and making announcements, and different coloured T-shirts were worn by the teams.

The tournament got over by 6.30 p.m.

(Mobile : 9867958535)

# अभिनंदन

✶ १८ जानेवारी २०२० रोजी श्री. राजन मोतीराम जयकर यांचे डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियममध्ये पाठारे प्रभू यांच्या मुंबईतील प्रथम रहिवासाबद्दल अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. महाराष्ट्रातील 'समाजरंग' मध्ये पाठारे प्रभूंची माहिती प्रसिद्ध झाली. त्यात सौ. केतकी आणि श्री. राजन यांचे परभू वेषातील छायाचित्र प्रसिद्ध झाले. तसेच २३ जानेवारी २०२० रोजी 'राजेरजवाड्यांचे छंद आणि छंदातील राजेशाही' यावर त्यांचे विचारही अभ्यासकांना ऐकायला मिळाले.

✶ मृदुला प्रभुराम जोशी यांनी लोकसत्तात श्री. रामदास भटकळांवर लेख लिहून त्यांच्या संपादकीय कारकिर्दीतील त्यांचे योगदान विशेषत्वाने मांडले.

✶ डॉ. सुमन नवलकर यांचे डिसेंबरमध्ये आकाशवाणीवर 'ऐसी अक्षरे रसिके' मध्ये तीन दिवस ललितबंध सादर झाले. गिरगावच्या नाना-नानी शाळेत त्यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम झाला. यावेळी श्रोत्यांनी त्यांची पुस्तकेही विकत घेतली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या उस्मानाबाद येथील ९३व्या संमेलनातील बालमेळाव्यात त्यांनी निमंत्रित म्हणून सहभाग घेतला. त्यांच्या 'काटेरी मुकुट' या बालकादंबरीला 'श्रीमंत गंगाबाई वाचन मंदिरा'चा बालसाहित्य पुरस्कार मिळाला.

✶ विशेष अभिनंदनीय बाब म्हणजे श्री. **आकाश आशुतोष राजेन्द्र नवलकर** यांची गिनेज बुकमध्ये नोंद झाली. आकाश श्री. शंकर रामराव झावबा यांचे पणतू. पणजोबांची गाणे आणि वाद्यकला आकाशमध्ये उतरली आहे. जगातील सर्वात मोठ्या संख्येने (१०००) सादर केलेल्या वाद्यवृंदात, सिनेमॅटिक बँडमध्ये त्यांचा गिटारिस्ट म्हणून सहभाग होता. 'द फरगॉटन आर्मी - आझादी के लिये' या सादरीकरणात एक हजार जणांचा सहभाग होता. आधीचा विक्रम मोडीत काढत या संगीतवृंदाने 'वर्ल्ड रेकॉर्ड' केला.

✶ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी मुंबई मराठी साहित्य संघात रेखा नार्वेकरांसह दिनकर गांगल यांची मुलाखत घेतली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे वीणा गवाणकर यांची मुलाखतही घेतली. महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा सहभाग होता. 'समाजाची बदलती मूल्ये' या परिसंवादाचे सूत्रसंचालनही त्यांनी केले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्ताने दूरदर्शनवर झालेल्या महाचर्चेत त्यांचा सहभाग होता.

✳

नाळ

# ताई

-हेमंत विनायकराव तळपदे

जन्म देऊनी या इहलोकात आणी
ती आई
करड्या नजरेने अनुशासन रुजवी ते
बाबा
आणि या दोघांचा मेळ असते ती
'ताई'

खरोखरच ताई या विषयावर लिहिण्यास फारसे कोणी उत्सुक नाहीत. पण खरोखर विचार केला तर ही ताई तिच्या लहान भावांसाठी सर्वकाही असते. भाऊ जर मोठा असेल, 'दादा' असेल तर तोदेखील आपल्या लहान बहिणीची काळजी घेतोच. पण बहीण जर मोठी असेल, 'ताई' असेल तर तिची जबाबदारी व वात्सल्य आपल्या लहान भावाप्रती काकणभर जास्तच असते.

या गोष्टीचा त्या लहान भावाला अंमळ जास्तच लाभ मिळतो. एकीकडे आईची ममता, दुसरीकडे बाबांची शिस्त असतेच; पण आईबाबा आणि या लहान भावामध्ये ताई नावाचा रेशमी बंध आपसूकच जोडलेला असतो.

तसे पाहता या चिमुकल्या ताईची जबाबदारी लहान बाळाच्या जन्मापासूनच सुरू होते. बाळाच्या आंघोळ, मसाज, पोशाख करण्यास आईला मदत करणे, 'ताई, जरा बाबूवर लक्ष ठेव' असा आईचा आदेश तिला पाळावाच लागतो. बाबू थोडा मोठा झाल्यावर ती त्याला कडेवर घेऊन आनंदाने हुंदडत असते. बऱ्याच वेळा तो बाबू या ताईला उचलावयासही पेलतही नाही. तरी ती कौतुकाने त्याचा भार वहात असते. त्याच्याबरोबर खेळण्यात ती तासंतास रमते. कधीकधी या बाबूला ताईचे लहानपणीचे स्कर्ट, परकरही घातले जातात. आईनंतर या बाबूची काळजी ही छोटुकली ताई घेत असते.

दादा होणं चांगलं की ताई होणं चांगलं; यावर भिन्न मतेही पडतील. पण ताई होण्यात एक वेगळाच आनंद आहे. त्या बाळावर निस्वार्थी प्रेम करणे, त्याची देखभाल करता करता आपला दिनक्रम सुचारीत ठेवणे, आईबाबा कामानिमित्त घराबाहेर गेल्यावर त्या बाळाचे आईबाबा बनून त्याला आंघोळ घालण्यापासून ते भरविण्यापर्यंत सर्वकाही करणे, कधीकधी त्याचे प्रातर्विधीही उरकणे आणि हे सर्व करता करता ही छोटुकली ताई कधीही कंटाळत नाही वा रागावत नाही. इतक्या लहान वयात या ताईला इतकी समज उपजतच असते असे वाटते.

अनेकदा तो बाबू शाळेत जाऊ लागला की ही ताई त्याचे चिमुकले बोट पकडून त्याला आपल्याबरोबर शाळेतही घेऊन जाते. रस्त्यावर अशी लहान भावंडांची जोडी पाहताना आपल्यालाही एक सात्विक आनंद मिळतो. आपल्या भावाला तिच्या मैत्रिणीने अथवा मित्राने सतावल्यावर ती नागासारखी संतापाने फुत्कारते. तीदेखील शाळेतच शिकत असते तरीही आपल्या बाबूचा गृहपाठ पूर्ण करण्यात ती छानशी मदतही करते.

आईबाबांनाही आपल्या या गोजिऱ्या बाळांचा अभिमानही असतो आणि आपल्या गैरहजेरीत आपल्या बाबूला प्रेमाने सांभाळण्यास 'ताई' नावाचे समंजस अस्तित्व आहे याचे त्यांनाही भान असते.

बाबू महाविद्यालयात जाऊ लागतो तेव्हा कधीकधी ही ताई महाविद्यालयाच्या तिसऱ्या ते पाचव्या वर्षात असते. तिलाही मित्रमैत्रिणी असतात, तिचेही वेगळे छंद असतात. आपल्या करिअरला आकार देण्याची तिचीही वैयक्तिक धडपड सुरू असते. तिला सिनेमाला जाणे, सहलीला जाणे अथवा हॉटेलात पिझ्झा-बर्गर खाणे आवडतही असते. ती काही काकूबाई नसते. पण त्या वयातही आपल्या लहान भावाची जबाबदारी ती एका अनुषंगाने वाहात असते. घरात आई नसल्यास त्याला वाढणे, त्याचे कपडे काढून देणे, त्याच्या आलेल्या मित्र-मैत्रिणींची सरबराई करणे अशी अनेक कामे ती आपुलकीने करत असते. आई, बाबा आणि बाबू या त्रिकोणाचा ती संपातीमध्य असते.

ताईचे महत्त्व तिच्या लग्नाचे वेळी या घरातल्या सदस्यांना जाणवते. ताई सासरी जाणार हा विचार एका अंशाने चांगला वाटला तरी घरातील सदस्यांच्या अंतर्मनाला बैचेन करणारी घटना ठरते. तिच्या पाठवणीच्या वेळी आई-बाबा तर रडतातच पण तो बाबू (लहान भाऊ) मनातल्या मनात कोलमडतो. पुरुष असल्याने तो जोराने रडूही शकत नाही. पण त्याचे मन मात्र ताईच्या वियोगाच्या जाणीवेने हळुवार झालेले असते. त्यातही ही ताई लग्न होऊन जवळच्याच शहरात रहाणार असेल तर तो त्याच्या मनाला समजावू शकतो. पण जर ही ताई परगावी अथवा परदेशी जाणार असेल तर तिच्या वियोगाने तो बाबू सैरभर

(पान ५ कॉलम १ वर)

Just A Thought

# Letter Writing - A Dying Art

-Sou. Achala Subhash Desai

**शकुंतला - मेनका**

पत्रलेखन ही एक कला आहे. लिहिणाऱ्या व्यक्तीचे मनोगत व्यक्त होते व वाचकांना विचार करण्याची संधी मिळते. खालील पत्र मायलेकी मधला संवाद आहे. आमच्या स्नेही सौ. शोभा वि. कुलकर्णी ह्यांनी हा पत्ररुपी संवाद लिहिलेला आहे. पौराणिक काळात जाऊन वास्तवाचे भान राखण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

ह्या पत्ररुपी संवादाचा जरूर विचार करा व पत्राद्वारेच कळवा हा प्रयत्न कसा वाटला?

**-सौ. अचला सु. देसाई**

*शकुंतलेने मेनकेस लिहिलेले पत्र*

कण्व ऋषीपर्णकुटी
इहलोक

।।श्री।।

प्रिय आईस, प्रिय तरी कसे म्हणू? कारण तुझ्या कुशीचा, प्रेमळ स्पर्शाचा मी कधी अनुभवच घेतला नाही. **'आई'** हा शब्द हृदयाच्या मखमली पेटीत ठेवण्यासारखा आहे असे मी ऐकले खरे. पण खरे सांगू का आई? 'आई' हा शब्द मला कधी उच्चारता आला नाही. एवढी का मी अभागी दुर्दैवी, प्रत्यक्ष जन्मदात्या पित्यानेही अव्हेर करावा? आणि ते तर स्वत:ला **ब्रह्मर्षी** म्हणवून घेतात ना! पहा ना 'कण्व' बाबानी मला अगदी प्रेमाने वाढविले. काहीही कमी पडू दिले नाही. माझी ते खूप काळजी घेतात. माझ्या सख्या प्रियंवदा व अनुसया चांगली साथ देतात. हरिणांची पाडसे मला अत्यंत प्रिय आहेत. एक गंमत सांगू का? मी जर समोर दिसले नाही तर ते कावरे-बावरे होतात. मूक प्राणी बिचारे! त्यांनाही माया कळते. बाग तर मी इतकी सुंदर बनविली म्हणून सांगू! सारे लता-वृक्ष आनंदाने डोलत असतात. बागेतील फुलझाडांना पाणी घालताना ते जणू माझ्या केसांवर-अंगावर माळण्यासाठी अधीर झाले की काय; असे वाटू लागते. सारेजण असे म्हणतात की, जंगलात शकुन पक्ष्यांनी माझे जतन केले म्हणूनच माझे नाव 'शकुंतला' असे ठेवले. कण्वबाबांनीही हेच सांगितले. बाबांचे काम करताना मन अगदी भरून येते. त्यांची मी खूप काळजी घेते. अगदी सकाळच्या आन्हिकाला लागणाऱ्या सामानापासून त्यांचे सकाळचे दूध व फलाहार, तसेच दुपारचे जेवण ते संध्याकाळच्या संध्योपासनेच्या साहित्यापर्यंत मी स्वत: जातीने लक्ष घालते. त्यांनीही मला कसली उणीव भासू दिली नाही. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजते. पण 'आई'; उणीव वाटते ते तुझ्या प्रेमाची. असे वाटते तू अलगद आकाशातून खाली उतरावे आणि मी तुझ्या मिठीत सामावून जावे जणू गाय-वासराची भेटच. विरहाने गाय वासरू दिसताच हंबरते व तिला पान्हा फुटतो अगदी तसेच व्हावे. मी पूर्णपणे तुझ्या प्रेमाने प्रेमपान्ह्याने न्हाऊन निघावी अगदी दीर्घकालपर्यंत. पण कधी कधी मनात शंका येते. कलीयुगातील मानवाप्रमाणे मुलगी झाली म्हणून की काय, तू मला जन्मताच टाकून निघून गेलीस? आई देशील का उत्तर? पाठवशील का पत्र? सारेजण म्हणतात, माझी आई स्वर्गात आहे. तिथपर्यंत पोहचेल का हे पत्र? माझ्या अंतरीची तळमळ तू नक्की जाणून घेशील का? माझ्या भेटीला तू लवकर येशील अशी मी आशा करते.

मला एवढेच म्हणावेसे वाटते.

'आई मेनका तुझे लेकरु
कुशीत तुझीया घेई'

तुझीच दुरावलेली तुझी अभागी कन्या
**शकुंतला**

(मेनकेने पाठविलेले उत्तर)

ब्रह्मा, विष्णू, महेश
वैकुंठ निवास
मु. पो. इंद्रदरबार

।।श्री।।

अत्यंत प्रिय असलेल्या माझ्या प्राणप्रिय लेकरा, तुझे पत्र मिळाले आणि इतके वर्षे दाबून ठेवलेला उमाळा क्षणात बाहेर आला आणि असे वाटले की लगेचच खाली जावे आणि तुला घट्ट मिठी मारावी. तुला कुशीत घ्यावे. प्रेमाने न्हाऊन निघावे. इतक्या वर्षाची ती मिठी सैल कधी होऊच नये. पण हे होणे शक्य नाही कारण अपरिहार्य आहे. असो.

बाळा तुला सोडून येताना मी किती यातना भोगल्या म्हणून सांगू? ह्या माझ्या पोटच्या गोळ्याला जंगली श्वापदे खाऊन तर टाकणार नाहीत? या जाणीवेने जीव कासावीस झाला. तुझ्यावर स्थिर झालेली नजर हटत नव्हती. स्वर्गात जावयाला मन धजत नव्हते. दुरूनच तुला पाहत असताना 'शकुन' पक्षांनी तुझ्यावर मायेची पखरण घातलेली पाहिली. काही क्षण मन स्थिरावले. धाडसाने निघाले खरी पण कायमची हुरहूर मनात ठेऊन. खरेच मी आई म्हणून कमी पडले. नवजात बालकाला टाकून येताना हृदयाचे तुकडे-तुकडे झाले की काय असे वाटत होते. साक्षीला डोंगर दऱ्या खोऱ्या तसेच सूर्य-चंद्र आहेत. 'आई' ह्या नावाला माझ्याकडून कलंक लागला खरा. पण मी हतबल होते गं! कारण मी एक देवत्व पावलेली अप्सरा. पण तेच देवत्व म्हणून अभिशाप ठरलेली दुर्दैवी माता.

(पान ६ कॉलम २ वर)

# उपेक्षित जमात

**-रश्मी वेलकर**

वयस्कर मंडळी ही या युगातील उपेक्षित जमात आहे.

'मातृदेवो भव', पितृदेवो भव' हा मंत्र जपणारी आपली पूर्वापार चालत आलेली संस्कृती झपाट्याने मागे पडत आहे. आईवडिलांचा सांभाळ करणे कायद्यानुसार बंधनकारक करण्याची वेळ आली आहे. ही बातमी वाचून मन खूपच कष्टी झाले.

आपल्या महाराष्ट्रात वृद्धांच्या छोट्याछोट्या गरजांची कुणालाही जाणीव नाही. कोणत्याही दुकानात, साध्या वा आलिशान ऑफिसमध्ये हॉटेल किंवा बँकेत एटीममध्ये जाण्यासाठी उंच पायऱ्या एक किंवा अनेक असतात आणि रेलिंगचा म्हणजेच कठड्याचा अभाव. कोणत्याही आधाराविना अगदी एक पायरी चढणेही किती अशक्य असते हे 'जावे त्याच्या वंशा' तेव्हाच कळते. फक्त हातातील काठीचा आधार पुरेसा नसतो. पण कोणालाही त्याची पर्वा नाही. त्यामुळे आम्हाला सतत कुणावर तरी अवलंबून रहावे लागते. कठड्याची सोय करणे सहज शक्य आहे. पण वृद्धांचा विचार करण्याची गरजच वास्तुविशारद किंवा मालकाला वाटत नाही हेच त्यामागचे कारण आहे.

वयपरत्वे दारावरची बेल वाजल्यावर पटकन् दार उघडणे आम्हाला शक्य होत नाही. पण दाराबाहेरच्या व्यक्तीला त्याचे काही सोयरसुतक नसते. विशेषत: कुरियरवाले तर घोड्यावर स्वार होऊनच येतात. कारण वृद्धांबद्दल विचार करण्याची मानसिकताच समाजातून लोप पावत आहे आणि त्याची कुणालाही जाणीव नाही हेच आमचे दुर्दैव.

तीच कथा फोन, मोबाईल अथवा लॅन्डलाईन फोनची. बेल वाजताक्षणीच तत्परतेने फोन उचलणे व उत्तर देणे अनेक वेळा शक्य नसते. कधी आपण फोनपासून लांब असतो; तर कधी घराबाहेर असल्यास बॅग अथवा पर्स किंवा खिशातून फोन बाहेर काढायला वेळ लागतो. पण पलिकडील व्यक्तीला इतकी सहनशीलता दाखवण्याची गरजच वाटत नाही. पटकन् फोन बंद करून टाकतात आणि धडपडत फोनपर्यंत पोहोचलेले आपण हताश होऊन स्तब्ध रहातो. मोबाईलवरून निदान फोन केलेल्या व्यक्तीचे नाव तरी समजते. नाहीतर हुकलेला फोन कुणाचा असेल हा विचार अस्वस्थ करतच राहतो. जास्त वेळ फोन वाजत राहू देण्याची आमची अपेक्षा रास्त नाही का?

आपल्या देशातील वा राज्यातील पर्यटनस्थळांचा विकास करतानाही वृद्धांच्या सोयीसुविधांचा विचार करण्याची आवश्यकता कुणालाही वाटत नाही. फक्त विमानतळावर व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध आहे.

इतर देशांमध्ये सर्व सार्वजनिक ठिकाणी व्हीलचेअरवरून फूटपाथवर चढण्यासाठी वा अन्य कुठेही प्रवेश करण्यासाठी उतरण, स्लोप, बंधनकारक आहे. मग वडिलधारी मंडळींचा मान राखण्याच्या फुशारक्या मारणाऱ्या या देशात अशी सोय का नसावी? मुंबईत तर फूटपाथ इतके उंच आहेत की त्यावर चढणे केवळ अशक्यच आहे.

आम्हा वृद्धांच्या समाजाकडून फार काही अपेक्षा नाहीत. पण स्वाभिमानाने स्वावलंबी होण्याच्या आमच्या प्रयत्नांना अगदी बेसिक सुविधा पुरवून थोडीतरी मदत करावी हीच माफक अपेक्षा.

---

## पा. प्र. महिला समाज
# आनंद मेळावा

**-सौ. छाया दिलीप विजयकर**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी दिनांक ५ जानेवारी २०२० रोजी आनंद मेळावा मोठ्या दिमाखात साजरा झाला.

समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजीत यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. सुरैना राणे मल्होत्रा त्यांची ओळख करून त्यांना भेटवस्तू व तेलपोळ्या देऊन सन्मान केला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता उद्घाटन होऊन आनंद मेळाव्याची सुरुवात झाली. त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले की पाठारे प्रभु ज्ञातीत जन्म झाल्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजते. महिला समाजाला १०५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले. नंतर त्यांनी सर्व स्टॉलला भेट देऊन मनमुराद आनंद लुटला. यापुढे त्यांनी राजकारणात भाग घेतला आहे हे सांगून महिला समाजाला कधीही मदत करण्याची तयारी दर्शविली.

लकी ड्रॉची १) जयेश कोठारे २) संगीता सातोसकर ३) प्रज्ञा मोहिते ह्यांना डॉ. सुरैना राणे मल्होत्रा ह्यांच्याकडून बक्षिसे देण्यात आली तसेच १) सुरेखा कुरवा २) निकीता नवलकर, ३) मेघना विजयकर, ४) जागृती घरत ५) सोनाली कोठारे यांना महिला समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांच्याकडून लकी ड्रॉ काढून बक्षिसे देण्यात आली.

जवळजवळ, ४८ स्टॉलनी हा आनंद मेळावा सजला होता. त्यात अनेक वस्तू आणि खाद्यपदार्थांची लयलूट होती. शाकाहारी, मांसाहारी पदार्थांचे स्टॉल्स गर्दीने फुलले होते.

महिला समाजाचा शिवण क्लासचा स्वत:चा स्टॉल होता. त्यात एप्रन व कापडी तऱ्हेतऱ्हेच्या बॅगस् होत्या. शिवण क्लासच्या मुलींना उत्तेजन देणे हाच महिला समाजाचा मुख्य उद्देश. सर्वात आकर्षण म्हणजे इतर कोठेही सहसा न दिसणारा भविष्य सांगणारा स्टॉल.

दरवर्षीप्रमाणे लोकांच्या भरपूर प्रतिसादामुळे व उत्साहामुळे आनंद मेळावा छान पार पडला. कित्येकांनी तिथेच कार्यक्रमाबद्दल लेखी अभिप्राय दिला.

---

**मनोमनी**

# कॉफी नावाचा इतिहास

**-रसिक विजयकर**

नेहमीप्रमाणे सकाळी एका हातात पेपर व दुसऱ्या हातात कॉफीचा मग घेऊन बसलो होतो. कॉफीच्या सुवासाने आणि स्वादाने मन टवटवीत झाले होते.पेपरमधील त्याच त्या रटाळ बातम्या वाचण्यास तयार झालो. मनात असा विचार आला की कॉफीत काय असा गुण आहे ज्यायोगे मन नेहमी प्रफुल्लीत रहाते? त्याचवेळी पेपरमधील एका बातमीने माझे लक्ष वेधून घेतले. ती म्हणजे कॉफी पिणाऱ्यांचे प्रमाण जगात वाढत चालले आहे. आतापर्यंत कॉफी कोणकोणत्या देशात होते इत्यादी माहिती भूगोलात वाचली होती. पण आज कॉफीचा इतिहास जाणून घ्यावयाची उत्कंठा वाढीस लागली. तर थोडक्यात कॉफीचा इतिहास हा असा आहे.

अशी एक दंतकथा आहे की एका देशात एक धनगर आपल्या मेंढ्या चरायला घेऊन जात होता. तेव्हा डोंगराच्या उतारावर एक नवीन वनस्पती आढळली. त्या वनस्पतीजवळ जाऊन बघण्याआधी त्याच्या मेंढ्या त्या वनस्पतीची पाने आणि बिया चघळायला लागली. काही वेळाने त्या धनगराच्या लक्षात आले की त्या मेंढरात चांगलाच उत्साह संचारला होता. ह्याचे काय कारण असावे ह्याचा तो धनगर बराच विचार करीत बसला व शेवटी त्याने ठरविले की स्वत: त्या वनस्पतीच्या बिया चघळून बघूया. त्याला कोठेतरी वाटत होते जो परिणाम त्या भुकेल्या मेंढरांवर झाला होता तोच अनुभव त्याला अनुभवाला मिळेल का? नंतर काही वेळाने त्याच्या लक्षात आले की खरोखरच मेंढरांवर जो परिणाम झाला होता तसाच उत्साह त्याच्या अंगात संचारला होता. ही एक वेगळीच अनुभूती होती. तेथूनच एक साधू जात होता. धनगर त्या साधूला त्या वनस्पतीच्या बियांचे परिणाम सांगू लागला. पण त्या साधूने त्याला दरडाविले व असे अघोरी कृत्य परत करू नको असे सांगितले. आणि तो साधू आपल्या पुढल्या वाटेने मार्गक्रमण करू लागला. पण त्याआधी त्या साधूने आपल्या पिशवीत काहीतरी लपविले होते. तो साधू आपल्या आश्रमात परतल्यानंतर आणलेल्या बियांचे परिणाम स्वत: वर काय होतात हे बघण्यास उत्सुक झाला. आणि काय आश्चर्य, धनगराने सांगितलेली गोष्ट त्याला पटू लागली. नंतर त्याच्या असे लक्षात आले की अनेक तास तपश्चर्या केल्याने येणारा थकवा ह्या बियांच्या सेवनाने नाहीसा होतो. अशारितीने ह्या कॉफीचा उपयोग हा जगासमोर आला. प्रथम एथोपियामधून कॉफीचा प्रसार अरेबियन देशात झाला. हळूहळू कॉफीचे गुणधर्म सर्व जगाला माहिती झाले व कॉफी ही किमती वस्तूपैकी एक झाली. जगात वर्षाला चारशे कोटी कप कॉफी लोक पितात. आतातर अनेकांना सकाळी कॉफीचा कप हातात मिळाला नाही तर दिवसाची सुरुवात चांगली झाली नाही असे वाटते .

अनेकांना कॉफी ही निद्रानाशक वाटते. पण ते काही खरे नाही. त्यात अनेक गुणधर्म दडलेले आहेत. कॉफीत असलेल्या थिओफिलिन ह्या घटक द्रव्यामुळे अस्थमा कमी होण्यास मदत होते. श्वसन नियमित होण्यास मदत होते. दररोज कॉफी सेवनाने काही प्रकारचे कॅंसर होण्याचे प्रमाण कमी होते. थोडक्यात कॉफी सेवनाने प्रकृती उत्तम राहण्यास मदतच होते.

आपण कॉफी पीत असलो तरी कित्येकांना कॉफीच्या वेगवेगळ्या स्वादांची माहिती नसते. त्या पेयाची पुरेपूर महती कळली नाही असे म्हणावे लागेल. त्यासाठी एखाद्या कॉफी शॉपला भेट द्या. तेथे वेगवेगळ्या कॉफीचे प्रकार एकदा तरी चाखून बघा. मला खात्री आहे की ह्या कॉफीच्या प्रेमात आणखी गुरफुटून जाल !

(मोबाईल : ९८१९२७६६६६)

*

**बालविभाग**

***Aaji's Stories***

## The Real Santa Claus

**- Abha Desai**
(Std V)

When I was small, I used to try to stay awake on every Christmas eve. But unfortunately, I could never stay awake till 12:00 am. And next morning, there used to be many gifts for me. I used to wonder, how does he come to know about what I want? How does he remember everyone's address? Every Christmas I used to wonder this. After I grew up I thought that sometimes our parents become our Santa Claus and some times our friends are Santa Claus. Last year I had gone for a Christmas party. There my friend told me that Santa is real, but I couldn't believe it. Then she told me a story about "The Real Santa Claus".

St. Nicholas was an orphan. His parents died when he was young leaving behind huge amount of money. He lived during the fourth century in a region called Myra, now known as Turkey. In his town was a family that had lost everything and they were so poor that they had nothing to eat. The family had three daughters, and each one was about to be sold into slavery, forced to pay off the family debt. There was no other choice. They couldn't afford to live at home anymore. The night before when the first daughter was going to be sold, she washed her stockings and hung them up by the fire to dry. It was going to be a sad day tomorrow. The next day, when she woke up, she saw a lump in her stockings. Reaching in, she found a small bag. Inside the bag was enough gold to save her from being sold. Still the other two daughters would have to be sold. The next morning, another bag of gold was found. And now the second daughter was going to be saved too. The next night, the father decided to stay awake to see who the person was helping his daughters. He fell asleep but woke up when he heard a loud noise as a small bag was thrown through the open window and landed near the stocking by the fire place. He jumped up and ran outside. It was the young man from the village whose uncle was a priest.

Now there was enough money for the family to eat too. The man was St. Nicholas. He continued to help people and asked for no thanks. He did it secretly. He did not want attention or glory. St. Nicholas would eventually become a bishop and word of his generosity spread around the world. He became an example of how we should live and how we should treat each other. St. Nicholas is now known as Santa Claus and this is his story. Oranges are often placed inside stockings, representing the gold that saved the daughters. This is why there is a Christmas tradition of hanging up stockings.

After hearing this story, I realized that Santa Claus is indeed real. Even this Christmas eve, I will eagerly hang stockings and wait for Santa's visit. May we all be blessed with the generosity and spirit of St. Nicholas and Christmas!

(Mobile : 8928568203)

## Picnic to Silent Hill Resort

**-Eva Nimish Dhairyawan**
(Std. IV)

All children go to school to study for their future. But there is a day which is for fun and it is a picnic. My school went to silent Hill Resort. Our school had arranged big buses. My class was travelling in bus no. 5. We reached at 10.08.

After getting down from bus, I saw the resort and it was very beautiful. The resort managers gave us places to keep our bags. After keeping our bags, we went out to eat breakfast. After we ate breakfast we played for 10 minutes in the tyre park. Then they told us to change our clothes and wear our swimming suits. They took us to the water park. there was a pool. After some time we got out of the water and had a photo with our teacher. Then we changed in the restroom and had lunch. There was pavbhaji manchaw and rice and srikhand puri. After eating our teachers took us to a very big park. There was a small place for swans too.

It was finally time to go home. While going to the buses they gave us ice-cream and popcorn. We slept for some time in the bus. By the time I woke up we had reached our school. our parents came to pick up. I had a lot of fun there.

## "Save me" she cries!

**-Simran Ashish Desai**
(Std. IX)

Sitting on the chair next to him
I heard many things
Nurse informed, "Congrats, you have become a father"
Anxiously, asked he "who is it?"
"Baby girl!" happily she exclaimed.
He paused for a while and walked right in

Mother was afraid, she knew him
Angrily, he looked at her
Kept in the cradle the girl like fur
About to catch hold of her
Mother stopped him,
Her eyes were bright, fierce
Of course, should be
It was the matter of her girl
She stood strong! I could see

Mother pulled him back, with all her might
With a tear in her eye
Took the baby girl in her hand and said
"Don't let her fall off like sand"
"She's our pride, don't you realise?"
Please try to listen,
"Save me", she cries!

*

(पान ३ कॉलम ४ वरून)

होतो. आईला त्याची समजूत काढताना नाकीनऊ येते.

आता मात्र भ्रमणध्वनीद्वारे आपण एकमेकांच्या संपर्कात राहू शकतो. पण पूर्वी तशी सोय नव्हती. या ताईची ताईगिरी खऱ्या अर्थाने रक्षाबंधन आणि भाऊबीजेला दिसते. रक्षाबंधनाच्या दिवशी तिने भावाच्या मनगटावर बांधलेली राखी त्याच्या मनाला खरा सात्विक आनंद देते. भाऊबीजेच्या दिवशी ताई भावाला आरती ओवाळते तेव्हा त्या आरतीच्या वातीचे प्रतिबिंब त्या दोघांच्याही डोळ्यात स्पष्टपणे उमटते.

अशी ही ताई आपल्या संकटसमयी एक खंबीर आधारच असते. अनेकदा वयात आल्यानंतरही आपण तिच्याकडून अनेक बोध घेत असतो. बऱ्याचदा आपल्यापेक्षा जास्त पावसाळे पाहिले असल्याने म्हणाना अथवा अनुभवाची शिदोरी चांगलीच जमिविली असल्याने म्हणाना; तिने सुचविलेला मार्ग अधिक परिणामकारक ठरतो. आपल्यामागे कोणीतरी आधार आहे, मायेची ऊब आपणास लाभलेली आहे हा विचारच आपणास या इहलोकी एक मुलायम प्रेरणा देतो आणि आपले जीवन सुसह्य करतो.

ज्यांना 'ताई' असण्याचा योग नशिबी नसतो ते एकप्रकारे या प्रेमाला वंचित रहातात. ताईचे या भावाच्या मनातील स्थान त्याने 'ताई' अशी हाक मारलेल्या सादेतच असते. त्याचे वर्णन कोणीही करू शकणार नाही. त्यासाठी लहान भाऊ होणेच महत्त्वाचे आहे.

तर मंडळी तुम्हालाही जर ताई असेल तर माझ्या भावना तुमच्यापर्यंत पोहोचल्याच असतील. अशी प्रेमळ ताई सर्वांना लाभो अशी परमेश्वराजवळ विनवणी करतो.

(मोबाईल : ९८२१६०७५९३)

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

३१-१२-१९ कु. रिमा अंजली राजन प्रधान श्री. चिन्मय अभय भाटवडेकर (आं.ज्ञा.)
११-१२-१९ कु. उत्कर्षिनी नितीन मोतीलाल कीर्तिकर श्री. नीरज जे. गंपावार (आं.ज्ञा.)
३०-०१-२० श्री. यश कुंदन आगासकर कु. सागरिका संजय परब (आं.ज्ञा.)
०४-०२-२० श्री. प्रेरित सुधीर रामदत्त नायक कु. प्रीती प्रकाश साईनाथ प्रधान (आं.ज्ञा.)
१४-२-२० कु. निशीता नीलेश विठोबा नायक श्री. अभिषेक राजेंद्र शिंदे (आं.ज्ञा.)

### विवाह रौप्य महोत्सव

१८-०२-१९ श्री. भूषण आनंदराव विजयकर कु. सीमा वासुदेव लोकरे
२५-१२-१९ श्री. नीतल प्रमोद तळपदे कु. प्राजक्ता श्रीपाद धैर्यवान

### विवाह सुवर्ण महोत्सव

०८-१२-१९ श्री. बकुळचंद्र चंद्रकान्त नवलकर कु. मृदुला वामनराव वाझकर
२८-१२-१९ श्री. विजय सुरेंद्र जयकर कु. रश्मी बाळाराम तळपदे

### मरण

३०-१२-१९ श्री. मयूर माधव बाळाराम नायक, वय ६९, अंधेरी
०४-०१-२० श्री. अंजन विठ्ठलराव कोठारे, वय ६७, अंधेरी

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. रचना आणि श्री. शशांक श्रीपाद विजयकर व श्री. उद्धव शशांक विजयकर यांजकडून स्वर्गीय सुमालिनी आणि स्वर्गीय श्री. श्रीपाद काळूराम विजयकर यांच्या स्मरणार्थ रु.२५०१/-

✶ कन्या रिमा हिच्या विवाहाप्रीत्यर्थ सौ. अंजली आणि श्री. राजन प्रधान यांजकडून रु.५००/-

देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

✶ आमच्या भूतपूर्व अतिथी संपादक सौ. निकेता प्रशांत राणे यांच्या वयाचा पष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा साजरा झाला.

✶ श्री. सुजन राणे सपत्नीक कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद संस्थेत निमंत्रित होते. त्यांचे तिथे शाही स्वागत झाले. त्यांनी रंगवलेले स्वामी विवेकानंदांचे तैलचित्र या आश्रमात विराजमान झाले. तेथे त्यांनी शास्त्रीय संगीताचीही बहार उडवून दिली.

✶ २१-०१-२०२० रोजी मुंबईत मॅरेथॉन खेळवली गेली. सीलिंक ते बांद्रा, बांद्रा ते परत सीलिंकवरून आझाद मैदान गाठलेल्या धावपटूंमध्ये सौ. अनुराधा सीमित देसाई यांचा यशस्वी सहभाग होता.

✶ सौ. स्मृती शीतल तळपदे यांचे गणेश जयंतीनिमित्त शिवाजी पार्क येथील गणेश मंदिरात नृत्य सादर झाले. तसेच श्री. शीतल तळपदे यांना हौशी मराठी नाट्यस्पर्धेत 'आय विटनेस' नाटकासाठी प्रकाशयोजनेचे पारितोषिक मिळाले

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

(पान ३ कॉलम ४ वरून)

माझ्यासारख्या अनेक हतबल आया आहेत. इंद्राच्या वचनाप्रमाणे मला पृथ्वीवर राहणे शक्य नव्हते. पण बाळा तू मुलगी झाली म्हणून नव्हे हो. हे बघ ना कुंतीलाही सामाजिक बांधीलकीमुळे कर्णाचा त्याग करावा लागला. तिने काय कमी यातना सोसल्या असतील? आजही मुलगी नको म्हणून टाकून दिलेली मुलगी बघीतली की, माझा भूतकाळ आठवतो, वेदना जाणवू लागतात. जीव कासावीस होतो. 'इहलोकी' ओरडून सांगावेसे वाटते 'थांबा' थांबवा ही अवहेलना. अहो ती तर तुमची धनाची पेटी अगदी शेवटपर्यंत प्रेमाने साथ देणारी. सीता-द्रौपदी यांनाही सत्त्वपरीक्षेला सामोरे जावे लागले. तेव्हा बाळा नारीजात ही अभिशापानेच जन्माला आली आहे की काय असे वाटते. काहीतरी क्रांती घडायला हवी. आदिशक्तीचे रूप प्रगट व्हायला हवे. असो.

भूतकाळात जाऊन खिन्न होण्यापेक्षा वर्तमानात जगायला शीक. बघ मला तुझे भविष्य दिसते आहे. एक सुंदर राजकुमार तुझ्या आयुष्यात येणार आहे. मध्येच वादळे आली तर डगमगून जाऊ नकोस. कारण तूही माता होणार आहेस. 'आई'चे हृदय तुला आणखी चांगलं उमगेल. तुझ्यापोटी येणारा पुत्र दाही दिशा उजळून टाकेल आणि त्या प्रकाशाकडे पाहून मी समाधान पावेन. स्वत:ला धन्य समजेन. आणि हो कण्वबाबांचे मी आभार कसे मानू हेच मला समजत नाही. एवढेच म्हणेन की, बाबा हे ऋण कधीच फेडू शकणार नाही. माफ करा मला.

प्रियंवदा - अनुसया यांना माझा आशीर्वाद. अशीच प्रेमाची साथ द्या. पाडसांना गोड गोड पापा.

शेवटी म्हणावेसे वाटते.

**शारदेची चाले वैखरी**
**आदिशक्ती हीच खरी**
**आईचे पद परम शिखरी**

कालांतराने नारीचा हा अभिशाप वरदान ठरेल ही आशा व्यक्त करते.

तुझीच, तुझीच दुर्दैवी आई
**मेनका**
(मोबाईल : ९८१९५६८७९९)

✳

## पत्र प्रतिक्रिया

डिसेंबर २४, २०१९

श्रीमती सुहासिनी कीर्तिकर
संपादक, प्रभु तरुण

लिहिण्यास कारण की झी मराठीच्या दीपावली अंकात प्रसिद्ध झालेला व डिसेंबरच्या प्रभुतरुणमध्ये पुनर्मुद्रित झालेला 'गिरगावची दिवाळी' हा लेख अप्रतिमच आहे. आम्ही स्वत: ही पाठारे प्रभुंची दीपावली लहानपणापासून प्रत्यक्ष अनुभवल्याने व त्याचा आनंद वर्षानुवर्षे घेत आल्याने आम्हाला तो अधिकच जवळचा वाटला.

ह्या लेखात आपण गिरगावच्या म्हणजे प्रामुख्याने पाठारे प्रभुंच्या दिवाळीचे इतके इत्थंभूत वर्णन केलेले आहे की ज्यांनी ही दिवाळी अनुभवलेली नाही त्यांनादेखील ह्या सर्वांगसुंदर सणाची पूर्ण कल्पना आली असेल. फक्त आपल्या माहितीकरिता सांगतो की त्याकाळी पणत्या व अनार (आताच्या भाषेत मटका अनार) ही घरीच बनवली जात असत. आमच्या धैर्यवान कुटुंबातील आमचे काका श्री. विष्णू रामराव धैर्यवान फार सुंदर अनार व पणत्या बनवत असत. त्याचप्रमाणे श्री. शरद मानकर, नायक कुटुंबीय व पिसाट कुटुंबीयदेखील घरीच अनार व पणत्या तयार करीत असत आणि त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लक्ष्मीपूजन म्हणजे पाठारे प्रभूंचे धनदिवे व बळीराजा ह्या प्रमुख दिवशी आम्ही त्याचे 'कोट' म्हणजे एकाच वेळेस ओळीने ६-६ अनार लावून त्याचा मनमुराद आनंद घेत असू. बरं त्यातही कोणत्या कुटुंबाने बनविलेले अनार अधिक उंच उडते अशी मजेची स्पर्धाही एका वेगळ्याच आनंदाने पण खेळीमेळीने होत असे.

आजही ही पाठारे प्रभुंची दिवाळी तिच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेने साजरी केली जाते हे आपण लेखात अंतर्भूत केले आहेच. पुन्हा एकवार एका सर्वांगसुंदर लेखाबद्दल आपले हार्दिक अभिनंदन

श्री. दीपक माधव धैर्यवान
(सेक्रेटरी, प्रभु तरुण)

✳

## परीक्षेतील सुयश

**एम्. एस्. इन कॉम्प्युटर इंजिनियरिंग (यूएसए)**

श्री. प्रतीक प्रकाश विजयकर

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर**
RNI NO. 14613/67